Consent H.M.P.30/169

Exh.12/D

# मा.दिवाणी न्यायाधिश साहेब (व.स्तर) माजलगाव यांच्या न्यायालयात

एच.एम.पी.नं. २३/ २०२६

अर्जदार : १) ईश्वरी भ्र.अमरसिंह देशमुख (लग्नानंतरचे नाव)
ईश्वरी पि.विलास तौर (लग्नापुर्वीचे नाव)
वय : २२ वर्षे, धंदा :घरकाम,रा.ईट ता.भुम जि.धाराशिव
ह.मु.काळेगावथडी, ता.माजलगाव जि.बीड

Order
Petitioners to argue on application.
SAHEBRAO SHESHRAO BUDRUK Digitally signed by SAHEBRAO SHESHRAO BUDRUK Date: 2026.04.15 17:29:26 +0530
C.J.S.D. Majalgaon

२) अमरसिंह पि.संजय देशमुख
वय : ३० वर्षे, धंदा : काही नाही,
रा.ईट ता.भुम जि.धाराशिव

विरुध्द

गैरअर्जदार: निरंक

प्रकरण : हिंदु विवाह कायदा १९५५ चे कलम १३ (ब) अन्वये विवाह विच्छेदन होवून मिळणे बाबत.

अर्ज : निर्देशीत कालावधी माफ करणेकरीताचा अर्ज.

स.महोदय,

अर्जदार नं.१ व २ हे आपला निर्देशीत कालावधी माफ करीताचा विनंती अर्ज खालीलप्रमाणे देत आहेत,

१) असे की,अर्जदार नं.१ व २ यांचा विवाह हिंदु धर्मशास्त्र व जाती रुढी पंरपंरेनुसार दि.२०/०६/२०२३ रोजी सौभाग्य मंगल कार्यालय, गढी रोड माजलगाव ता.माजलगाव जि.बीड येथे संपन्न झालेला आहे. अर्जदार नं.१ व २ यांचे पतीपत्नीत्वाचे नाते अदयापही कायम आहे. लग्न संबंधातून उभयतांना कोणतेही मुलबाळ झालेले नाही अथवा आजरोजी अर्जदार नं.१ ही अर्जदार नं.२ पासून गरोदर नाही.

२) असे की, अर्जदार नं.१ ही लग्नानंतर अर्जदार नं.२ यांचेकडे ईट येथे नांदावयास गेली. अर्जदार नं.१ व २ हे पतीपत्नी म्हणून सोबत पंधरा दिवस

राहिले परंतू त्यांचे अर्जदार नं.१ व २ हे एकमेकास समजुन घेत नसत तसेच एकमेकास वेळ देत नसल्यामुळे त्यांच्या स्वभावात मतभिन्नता होती. त्यामुळे त्यांच्यामध्ये आपसात पटेनासे झाले व त्यांचेमध्ये सतत मतभेद होवून भांडणे होवू लागले व सदर मतभेद जास्त वाढल्याने त्यांच्यामध्ये वितुष्ठ निर्माण झाले. अर्जदार नं.१ व २ मध्ये कोणतेही धार्मिक विधी संपन्न झालेले नसुन ते पतीपत्नी म्हणुन कधीच एकत्र आले नाहीत. त्यावेळी अर्जदार नं.१ व अर्जदार नं.२ यांना त्यांचे नातेवाईकांनी समजावून सांगून चांगला संसार करण्याची विनंती केली परंतू अर्जदार नं.१ व २ यांनी कोणाचेही काहीही ऐकले नाही.

३) असे की, अर्जदार नं.१ व २ हे सोबत एकत्र राहून संसार करु शकत नाहीत व पतीपत्नी म्हणून सोबत राहू शकत नाहीत त्यामुळे अर्जदार नं.१ हिला अर्जदार नं.२ च्या घरी जीवन जगणे अवघड झाले. त्यामुळे अर्जदार नं.१ ही स्वईच्छेने दिनांक ०६/०७/२०२३ रोजीपासून अर्जदार नं.२ पासून वेगळे होवून तिचे माहेरी आईवडीलांकडे काळेगावथडी ता.माजलगाव जि.बीड येथे राहत आहे.

४) असे की, त्यानंतर देखील अर्जदार नं.१ व २ यांचे दोन्हीकडील नातेवाईकांनी अर्जदार नं.१ व २ यांच्यामध्ये समेट घडवून आणण्याचा खुप प्रयत्न केला परंतू अर्जदार नं.१ व २ हे एकमेकांसोबत राहणार नाहीत म्हणून असे त्यांचे ठाम मत असून त्यांना एकमेकांसोबत पतीपत्नी म्हणून राहणे जरुरीचे वाटत नाही तसेच भविष्यात ते पतीपत्नी म्हणून एकत्र नांदू शकत नाही म्हणून दोन्ही कडील नातेवाईकांनी प्रयत्न करुनही अर्जदार नं.१ व २ मागील अडीच वर्षापासून जास्त काळ एकमेकांपासून विभक्त राहत आहेत तसेच दोघांचे स्वभाव भिन्न असून अर्जदार नं.१ व २ हे एकत्र राहून संसार करु शकत नाहीत व कधी एकत्र येवु शकत नाहीत अशी दोघांनाही खात्री झालेली आहे.

५) असे की, अडीच वर्षापासून जास्त काळ अर्जदार नं.१ ही अर्जदार नं.२ पासून विभक्त राहून आपले स्वतंत्र जीवन जगत आहे. मधल्या काळात अर्जदारांना

असे जाणवले की, आता यापुढील काळात उभयंताचे जीवन सुखाचे व समाधानाचे व्हावयाचे असेल तर दोघांनी आपआपसात असलेले पतीपत्नीत्वाचे नाते संमतीने व सहमताने कायमचे संपुष्ठात आणणे संयुक्तीक ठरणार आहे.

६) असे की, अर्जदार नं.१ व २ यांनी आजपर्यंतच्या त्यांचे वैवाहिक आयुष्यात एकमेकापासून मनःस्ताप भोगला आहे व सदरच्या प्रकारामुळे अर्जदार यांच्या घरात सतत निर्माण होणारे गोंधळ व स्थिरता या सर्व बाबींचा विचार करुन अर्जदार नं.१ व २ यांनी पतीपत्नीत्वाचे नाते संपुष्ठात आणून एकमेकांपासून घटस्फोट घेवून विभक्त होण्याचा निर्णय घेतला आहे. अर्जदार नं.१ व २ हे आडीच वर्षापासून अधिक काळ पतीपत्नी या नात्याने कधीच एकत्र आले नव्हते व एकत्र राहिले नाही. तसेच ते यापुढे एकत्र राहणार नाहीत अशी खात्री त्यांना पटली आहे.

७) असे की,अर्जदार नं.१ व २ व त्यांचे नातेवाईकामध्ये दि.२०/०२/२०२६ रोजी बैठक होवून उभयंतामध्ये झालेल्या बैठकीमध्ये नातेवाईकासमक्ष अर्जदार नं.१ व २ यांनी त्याचे वैवाहिक नाते कायमचे संपुष्ठात आणण्याचे ठरवले असून संमतीने घटस्फोट घेण्यासाठी प्रकरण दाखल केले आहे.

८) असे की, अर्जदार नं.१ ही अर्जदार नं.२ व त्याचे कुटुंबियाविरुध्द कोणत्याही न्यायालयात कोणत्याही प्रकारची दिवाणी फौजदारी व इतर तत्सम कायद्यान्वये पोटगी मिळण्यासाठी व वाढीव पोटगी मिळण्यासाठी कार्यवाही दाखल केलेली नाही व यापुढे ही करणार नाही, तसेच अर्जदार नं.१ ही अर्जदार नं.२ च्या विरुध्द त्याचे स्थावर जंगम मालमत्तेबाबत कोणताही दावा किंवा अर्ज दाखल करणार नाही. अर्जदार नं.१ हिस यापुढे पोटगी मागण्याचा अधिकार राहणार नसल्याचे तिने मान्य केलेले आहे. तसेच अर्जदार नं.१ ही तिचे अर्जदार नं.२ ची पत्नी म्हणुन असणारे सर्व हक्क व अधिकार हे अर्जदार नं.१ ही सोडुन देत आहे.

७) असे की, अर्जदार नं.१ व २ यांना सहा महिन्याचा कालावधी माफ करुन प्रकरणात योग्य तो निर्णय होणे अत्यंत महत्वाचे आहे. त्यामुळे अर्जदारांची सोय होणार आहे तसेच ते त्यांचे इच्छेने दुसरेविवाह करतील. म्हणून प्रकरणात निर्देशीत कालावधी माफ करुन अर्जदारांचा अर्ज निकाली काढणे न्याय व योग्य आहे. सोबत शपथपत्र दिले आहे.

**तरी विनंती की,**

अर्ज मंजुर करुन प्रस्तुत प्रकरण निकाली काढण्याकरीता निर्देशीत कालावधी माफ करण्याची कृपा करावी.

दिनांक : १५/०४/२०२६ अर्जदार नं.१ व २

ठिकाण : माजलगाव

वरील अर्जातील संपूर्ण मजकुर आमचे माहिती व समजुतीप्रमाणे नमुद करण्यात आलेला असून संपुर्ण मजकुर आम्ही वाचून पाहिला व समजावून घेतला तो खरा व बरोबर असून आम्हाला मान्य व कबुल आहे.

दिनांक : १५/०४/२०२६ अर्जदार नं.१ व २

ठिकाण : माजलगाव

मार्फत :

ॲड.आर.आर.साबळे

माजलगाव.